# <u>जाहीर नोटीस</u>

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग व त्यांचे नियंत्रणाखाली येणा–या दिवाणी न्यायालय (क.स्तर), सावंतवाडी/वेंगुर्ला/कुडाळ/कणकवली/देवगड/दोडामार्ग/मालवण या न्यायालयांमध्ये परफेक्ट कंपनीचे ई–कोर्ट फेज–२ प्रकल्पांतर्गत पुरविणेत आलेल्या डिझेल जनरेटर यांचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार दि.१४/०४/२०२६ रोजी संपणार आहे. सदरचे जनरेटर सुस्थितीत रहाणेसाठी त्यांची पुढील एक वर्षाकरीता **'वार्षिक देखभाल दुरुस्ती करार'** करणेसाठी खाली नमुद केलेप्रमाणे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| Rate for AMC with regular visits and breakdowns visit(With GST) | Rate for AMC with visits by covering battery and Alternator(With GST) | Rate for AMC of Complete Generator(With GST) |
|---|---|---|

<u>अटी व शर्ती</u>

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नावे असावे. सदर लखोटयावर **"जनरेटरच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीकरीता दरपत्रक "** असे नमूद असावे.

२) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार हा १ वर्षाचे कालावधीकरीता असेल.

३) दरपत्रक सादर करणा–या विक्रेत्यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

४) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करणा–या पुरवठादार यांनी जनरेटरची तक्रार नोंद करणेकरीता आपले संपर्क क्रमांक पुरवावयाचे असून, प्राप्त झालेल्या तक्रारींची त्वरीत दखल घेवून २४ तासांचे आत सदर तक्रारींचे निराकरण करावयाचे आहे.

५) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) वार्षिक देखभाल दुरुस्ती कराराचा खर्च हा त्रैमासिक पद्धतीने (Quarterly Basis) अदा करणेत येईल. सदरचा खर्च तेव्हाच अदा केला जाईल जेव्हा सर्व तक्रारींचे निराकरण केले जाईल. तसेच देखभालीसाठी कोणतीही आगावू रक्कम दिली जाणार नाही.

७) लिहून देणार यांचेशी केलेला वार्षिक देखभाल दुरुस्ती करार हा समाधानकारक नसल्यास सदर करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

८) करार करणेबाबतचा सर्व खर्च हा यशस्वी दरपत्रकदार यांनी स्वतः करावयाचा आहे.

९) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

१०) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचा राहील.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि.०७/०४/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय , सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

31/03/2026

दिनांकः– ३१/०३/२०२६

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./२७९६सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांकः– ३१/०३/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर–

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता